


# संचार: प्रसारमाध्यमांसाठी मार्गदर्शिका

## समलिंगी, उभयलिंगी, तृतियपंथी समाजांच्या विषयावरची योग्य शब्द व मांडणी करण्यासाठी तयार केलेली मार्गदर्शिका

लेखिका
अल्पना डांगे
स्वैर मराठी भाषांतर : बिंदुमाधव खिरे

The Humsafar Trust · India HIV/AIDS Alliance · Pehchan · Lakshya Trust · Samapathik Trust

# संचार

## प्रसारमाध्यमांसाठी मार्गदर्शिका

●

**समलिंगी, उभयलिंगी, तृतीयपंथी समाजांच्या विषयावरची मांडणी योग्य शब्दात व्हावी यासाठी तयार केलेली मार्गदर्शिका.**

**लेखिका : अल्पना डांगे**

**स्वैर मराठी भाषांतर**

**बिंदुमाधव खिरे**

© The Humsafar Trust

First Edition. Year 2015. Version 1.0.

ही मार्गदर्शिका ‘हमसफर ट्रस्ट’ च्या संचार प्रकल्पातून साकार झाली आहे.

या प्रकल्पाला ‘एचआयव्ही/एड्स अलायन्स’ च्या ‘पेहचान इनोव्हेशन फंड’ (GFATM Round 9) मधून अर्थसाहाय्य प्राप्त झालं आहे.

# प्रस्तावना

हजारो वर्षांपासून ख्रिश्चन व इस्लाम धर्मात समलिंगी संबंध करणाऱ्यांना पापी समजलं गेलं आहे. समलिंगी व्यक्तींना नाव नव्हतं. ते अनामिक होते. वर्णनं होती, ती त्यांच्या लैंगिक कृतीची. आजही अमेरिकेत अनेक वेळा 'सोडोमी' सारखे प्राचीन शब्द वापरले जातात.

या समाजाला नाव देण्याचा प्रयत्न इंग्लंडमध्ये एडवर्ड कारपेन्टरने, जर्मनीमध्ये मॅग्नस हर्शफिल्डने आणि ऑस्ट्रियामध्ये हॅवलॉक एलिसने केला. पण ते नाव शोधण्यास (ज्याला उपनिषदात 'वाक्' शब्द वापरलाय) खूप वेळ लागला. हर्शफिल्डने 'युरेनिअन' शब्द वापरला. एलिसने 'इनव्हर्ट' शब्द वापरला व शेवटी करोली मारिया कर्टबेनी यांनी 'होमोसेक्शुअल' म्हणजे समलिंगी आकर्षण असलेला, हा शब्द वापरला.

'होमोसेक्शुअल' (समलिंगी) शब्द आला व त्याचबरोबर या समाजाबद्दल प्रसारमाध्यमं लिहू लागली, बोलू लागली. सुरुवातीला हा विषय अत्यंत भडक पद्धतीने मांडला गेला. ऑस्कर वाईल्ड यांच्या संदर्भात बोलायचं झालं, तर त्यांच्या खटल्याच्या दरम्यान अत्यंत खालच्या पातळीचं लिखाण करण्यात आलं. होमोसेक्शुअलसाठी अमेरिकेत 'गे' हा शब्द वापरला जाऊ लागला (जो फ्रेंचमधील 'गाय' या शब्दापासून आला असा अंदाज आहे). 'गे' समाजाला प्रसारमाध्यमांनी सहिष्णुतेनी बघितलं नाही. आजही अनेक वेळा हा विषय थट्टा, विनोदासाठी किंवा 'समाजविघातक कृत्य' करणारा समाज अशा वाईट अर्थी वापरला जातो.

प्रसारमाध्यमांत जे भडक, अशास्त्रीय व एकतर्फी लैंगिक अल्पसंख्याक समाजाचं चित्र मांडलं जातं, ते बदलायला पाहिजे, असा विचार करून 'हमसफर ट्रस्ट'ने ही मार्गदर्शिका तयार करायचं ठरवलं. या मार्गदर्शिकेच्या आधारे प्रसारमाध्यमं हे विषय अचूक व योग्य पद्धतीने मांडतील, अशी आशा व्यक्त करतो.

अशोक राव कवी
अध्यक्ष : द हमसफर ट्रस्ट, मुंबई

# पेहचान

'पेहचान' म्हणजे 'ओळख'. 'ग्लोबल फंड' च्या अर्थसाहाय्याने पेहचान प्रकल्प राबवला जातो. लैंगिक अल्पसंख्याक समाजामध्ये एचआयव्हीचा प्रसार होऊ नये यासाठी व या वंचित समाजाला सक्षम करण्यासाठी हा प्रकल्प काम करतो.

भारतात पेहचानची सुरुवात ऑक्टोबर २०१० पासून झाली व 'नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन' (NACO) च्या आधारे भारतातील १७ राज्यात हा प्रकल्प राबवला जाऊ लागला.

या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात – लैंगिक अल्पसंख्याकांच्या संस्था उभ्या करण्यास मदत करणं, त्या सक्षम बनवणं, त्यांना प्रशिक्षण देणं हा केंद्रबिंदू होता. दुसऱ्या टप्प्यात गे, उभयलिंगी, समलिंगी लैंगिक संबंध ठेवणारे पुरुष (MSM), तृतीयपंथी, हिजडा समाजाला विविध आरोग्याच्या व कायद्याच्या संदर्भातल्या सुविधा पोचवणं हे उद्दिष्ट आहे.

भारताच्या पश्चिम विभागात या प्रकल्पाचं काम 'द हमसफर ट्रस्ट', मुंबई ही संस्था पाहते.

**पेहचानची उद्दिष्टं**

- लैंगिक अल्पसंख्याकांच्या संस्था स्थापन करण्यास मदत करणं.
- गे, उभयलिंगी, समलिंगी लैंगिक संबंध ठेवणारे पुरुष, तृतीयपंथी, हिजडा समाजाला विविध आरोग्याच्या व कायद्याच्या सुविधा पुरवणं.
- ज्या आरोग्यसेवा उपलब्ध आहेत त्या अधिक बळकट करणं. त्यांच्याशी लैंगिक अल्पसंख्याकांच्या विषयावर संवाद साधून त्यांचं अधिक प्रमाणात सहकार्य मिळवणं.
- समाजात एक सुदृढ दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न करणं, जेणेकरून

गे, उभयलिंगी, समलिंगी संबंध ठेवणारे पुरुष (MSM), तृतीयपंथी, हिजडा समाजावर भेदभाव होणार नाही, अत्याचार होणार नाहीत व ते सन्मानाने, आत्मविश्वासाने समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होऊ शकतील.

*****

# मनोगत

अनेक वर्षांपूर्वी माझी जेव्हा 'हमसफर ट्रस्ट'शी ओळख झाली तेव्हा मी एक विवाहित स्त्री होते. स्त्रियांच्या अधिकारांची पुरस्कर्ती होते, एक संशोधक होते व माझ्या कामाच्या अनुषंगाने मला विविध वंचित गटांबरोबर काम करायची संधी मिळाली. पण हमसफर ट्रस्टची ओळख होईपर्यंत मी एलजीबीटी(LGBT) समाजाबरोबर काम केलं नव्हतं. इथे कामाला लागल्यावर मला एलजीबीटी समाजाच्या व्यथा आणि त्या व्यथांचं गांभीर्य जाणवू लागलं. मला धक्का बसला आणि माझा प्रवास सुरू झाला– विविध लैंगिकतेच्या व्यक्तींशी ओळख होण्याचा, त्यांची जीवनपद्धती समजून घेण्याचा, त्यांना समाजानं स्वीकारावं ही त्यांची धडपड बघण्याचा. या समाजांच्या अधिकारांसाठी अत्यंत अवघड परिस्थितीत काम करणाऱ्या संस्था मी पाहिल्या. या प्रवासात मला भेटलेल्या लैंगिक अल्पसंख्याक मित्र–मैत्रिणींची मी मनापासून आभारी आहे कारण त्यांनी मला, कोणताही भेदभाव न करता, त्यांच्यात सामावून घेतलं.

प्रसारमाध्यमांसाठी 'संचार' ही एलजीबीटी विषयावरची मार्गदर्शिका तयार करावी असा विचार अनेक वर्षं 'द हमसफर ट्रस्ट'च्या विश्वस्तांच्या मनात होता. जर 'इंडिया एचआयव्ही/एड्स अलायन्स'नी अर्थसाहाय्य दिलं नसतं तर हा प्रकल्प होऊ शकला नसता. मी 'अलायन्स'च्या सोनल मेहता, अबिना आहेर व यशविंदर सिंग यांचे मनापासून आभार मानते.

त्याच बरोबर 'GLAAD' मीडियाच्या सेथ ॲडम यांचे आभार,

त्यांनी मला त्यांच्या मार्गदर्शिकेतून काही भाग वापरण्यास परवानगी दिली.

'संचार' प्रकल्पात मला अनेक जणांची मदत झाली. अनेकांनी मला मोलाच्या सूचना केल्या. सुहेल आबासी, श्रीधर रंगायन, नितीन करानी, शिबू थॉमस, मानवेंद्र सिंग गोहिल (लक्ष्य ट्रस्ट), सिलवेस्टर मर्चंट, (लक्ष्य ट्रस्ट) व ओवेस खान यांचे मी आभार मानते. विशेष आभार बिंदुमाधव खिरे (समपथिक ट्रस्ट) यांचे. त्यांनी हा प्रकल्प चांगल्या दर्जाचा व्हावा यासाठी प्रोत्साहन दिलं. 'हमसफर ट्रस्ट'मधले अशोक राव कवी, विवेक राज आनंद व पल्लव पाटणकर यांनी मला हा प्रकल्प देऊन माझ्यावर विश्वास दाखवला व सतत प्रोत्साहन दिलं. सोनल यांनी मला तांत्रिक गोष्टीत मदत केली. माझे सहकारी श्रुता मेंगळे व उर्मी जाधव यांनी मोलाच्या सूचना दिल्या. दिप्ती शिंदे व अंकुर श्रीवास्तव यांनी संशोधनात मदत केली व रमेश जगताप यांनी आर्थिक व्यवहार सांभाळले. सोनल ग्यानी यांनी व्यवस्थापनाचा भार सांभाळला.

शेवटचं पण महत्त्वाचं. माझ्या दोन मुलांचे आभार. माझ्या प्रकल्पाचं काम चालू असताना त्यांनी खूप सहनशीलता दाखवली त्यामुळे त्यांचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे.

मी आशा करते, की ही मार्गदर्शिका प्रसारमाध्यमांमध्ये काम करणाऱ्यांना उपयोगी ठरेल व याच्या पुढे सुधारित आवृत्त्या निघतील.

अल्पना डांगे

सल्लागार

****

# भाषांतरकाराचे मनोगत

मूळ मार्गदर्शिका अल्पना डांगे यांनी इंग्रजीमध्ये तयार केली आहे. त्याचं स्वैर मराठी भाषांतर मी केलं आहे. काही भाग मी संक्षिप्त करून मांडला आहे. काही गोष्टी ज्या इंग्रजी भाषेस लागू होतात पण मराठीस लागू होत नाहीत त्या वगळल्या आहेत. तसंच काही शब्दप्रयोग मराठीत होतात पण इंग्रजीमध्ये होत नाहीत, ते वापरले आहेत. काही इंग्रजी शब्द मी तसेच ठेवले आहेत व त्या ठिकाणी नमूद केलं आहे, की मराठीतही तोच शब्द वापरावा. मराठीतल्या शब्दांना जिथे शक्य आहे, तिथे मी कंसात इंग्रजी शब्दही दिला आहे.

**ऋणनिर्देश**

मराठी भाषांतराच्या कामात मला करुणदीप जेटीथोर, अजय धिवार, पायल खळदे, विक्रमसिंह पवार, परीक्षित शेटे, टिनेश चोपडे व चेतन जाधव यांनी मोलाची मदत केली. चंद्रशेखर बेगमपुरे यांनी अक्षर जुळणी व लेआऊटचं काम केलं. अंजली मुळे यांनी संपादकीय संस्कार केले. मुखपृष्ठ कमलेश गाडे यांनी तयार केलं. शेखर देशमुख (दिव्य मराठी), प्राची कुलकर्णी (आय.बी.एन. लोकमत), संयोगीता ढमढेरे (CFAR) व नम्रता भिंगार्डे (युनिक फिचर्स) यांनी ही मार्गदर्शिका वाचून सूचना दिल्या. या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे.

**बिंदुमाधव खिरे**

अध्यक्ष : समपथिक ट्रस्ट, पुणे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | प्राथमिक ओळख | ११ |
| २) | व्याख्या | १३ |
| ३) | ट्रान्सजेंडर व्यक्तींबद्दल | २१ |
| ४) | दोन महत्त्वाचे निकाल | २४ |
| ५) | शब्द/विधानांचा वापर | २८ |
| ६) | तपासायचे मुद्दे | ३३ |
| ७) | दृष्टिकोनाची तपासणी | ४१ |
| ८) | नीतिमूल्ये | ४४ |


## परिशिष्ट


| | | |
|---|---|---|
| (अ) | संदर्भ | ४६ |
| (ब) | वेबसाईट्स | ४६ |
| (क) | संस्था | ४७ |
| (ड) | मराठी पुस्तकं | ५२ |
| (इ) | अधिक माहिती– पुस्तकं, मासिकं, चित्रपटांची यादी | ५३ |
| (फ) | 'कशिष' क्विअर अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव | ५७ |
| (ग) | 'पेहचान' सब–रेसिपियन्ट्स | ६२ |


***

# प्राथमिक ओळख

प्रसारमाध्यमांमध्ये लैंगिक अल्पसंख्याकांची अचूक व योग्य बातमी येण्यासाठी केलेला हा प्रयत्न आहे.

समलिंगी (गे), उभयलिंगी (बायसेक्शुअल), तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) या समाजाला भारतात लैंगिक अल्पसंख्याक म्हणतात. एकविसाव्या शतकात, या समाजाला साथ द्यायची का विरोध करायचा अशा मानसिक द्वंद्वात आजचा उर्वरित समाज दिसतो. विविध प्रसारमाध्यमांच्या मदतीने हा विषय प्रत्येकाच्या घरी पोचला. आमच्या संशोधनात दिसून आलं की या कामात माध्यमांची दोन प्रकारे मदत झाली. पहिला म्हणजे जो समाज प्रसिद्धीपराङ्मुख होता, अत्यंत गोपनीय जीवनपद्धती जगत होता, अशा समाजाचे प्रश्न लोकांसमोर मांडण्यास या माध्यमांनी मदत केली. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या समाजाला एक नागरिक म्हणून मिळणाऱ्या अधिकारांसंदर्भात, हा समाज कोणत्या प्रकारे वंचित आहे, याबद्दल सविस्तर चर्चा/विचार प्रसारमाध्यमांनी मांडले.

या दोन्ही मुद्द्यांमध्ये लैंगिक अल्पसंख्याकांकडे कसं बघितलं जातं, त्यांच्या विषयांची मांडणी कशी केली जाते हे खूप महत्त्वाचं ठरतं. जरी बहुतांशी लोकांची मतं धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांवर आधारित असली तरी विविध मतप्रवाह समाजासमोर आणणं, नवीन विचारांसाठी एक व्यासपीठ देणं हे काम प्रसारमाध्यमं करत असतात. आणि म्हणूनच प्रसारमाध्यमांकडून लैंगिक अल्पसंख्याक समाजाची मांडणी अचूक व योग्य प्रकारे व्हावी ही अपेक्षा असते.

हे ध्येय साध्य करणं सोपं नाही. आमच्या संशोधनात व प्रसारमाध्यमांबरोबर ज्या कार्यशाळा घेतल्या गेल्या, त्यात परत परत दिसून आलंय, की या विषयांबद्दल प्रसारमाध्यमांत काम करणाऱ्या अनेकांमध्ये व विशेषत: प्रादेशिक भाषांमध्ये काम करणाऱ्या पत्रकारांमध्ये खूप अज्ञान आहे.

काहींमध्ये अगदी प्राथमिक व्याख्यांबद्दलसुद्धा अज्ञान दिसून आलं आहे आणि त्यामुळे चुकीचे शब्द वापरले जात आहेत. स्वाभाविक आहे, की त्यामुळे सामान्य वाचकांच्या मनातील गोंधळ अजूनच वाढतो, पूर्वग्रह अजून बळकट होतात.

जर या समाजाबद्दल पूर्वग्रहदूषित दृष्टी असेल तर निकोपपणे या विषयांकडे बघता येत नाही व ही नकारात्मक दृष्टी मांडणीमध्येही डोकावते.

अशी, काही वेळा चुकीची, काही वेळा एकतर्फी तर काही वेळा पूर्वग्रहदूषित मांडणी नजरेस आल्यामुळे या विषयांवर काम करणाऱ्या काही संस्थांना प्रश्न पडला, की आपण या त्रूटी भरून काढण्यासाठी काय करू शकतो ?

या प्रश्नाची अनेक वेगवेगळी उत्तरं मिळाली, त्यातलं एक महत्त्वाचं उत्तर होतं – 'संचार' प्रकल्प.

या प्रकल्पातील टप्पे–

– या विषयावरच्या माध्यमांच्या मांडणीचं सर्वेक्षण करणं.

– प्रसारमाध्यमांमध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञ लोकांबरोबर कार्यशाळेच्या रूपाने संवाद साधणं, त्यांच्याकडून सूचना, टिप्पणी घेणं.

– या सर्व माहितीतून प्रसारमाध्यमांसाठी एक मार्गदर्शिका बनवणं.

या सर्व प्रकल्पाची कल्पना 'द हमसफर ट्रस्ट'ची होती व 'अलायन्स'च्या 'पेहचान इनोव्हेशन फंड' च्या आर्थिक साहाय्याने ती साकार करता आली.

प्रसारमाध्यमांना या विषयाची अचूक माहिती मिळावी तसंच या विषयाची अधिक माहिती कोठून मिळेल याचे संदर्भ मिळावेत, जेणेकरून ते या विषयाची मांडणी अचूक व योग्य प्रकारे करतील, हे या मार्गदर्शिकेचं उद्दिष्ट आहे.

# व्याख्या

या भागातील व्याख्या GLAAD च्या प्रसारमाध्यम मार्गदर्शिकेतून घेतलेल्या आहेत. [1] (आवश्यक असेल तिथे त्या व्याख्यांमध्ये बदल केले आहेत.)

- **सेक्स** (Sex)

सेक्सचे दोन अर्थ निघतात. स्त्री, पुरुष, प्राणी यांचं लिंग. जन्माला आल्यावर त्या बाळाला ज्या शारीरिक लिंगानी ओळखलं जातं ते. उदा. मुलगा/मुलगी. दुसरा अर्थ, 'सेक्स' म्हणजे संभोग/लैंगिक संबंध.

- **लैंगिकता** (Sexuality)

एखाद्या व्यक्तीचं शारीरिक लिंग, त्याचं/तिचं लैंगिक आकर्षण कोणाबद्दल असतं, त्याचा/तिचा लिंगभाव कोणता आहे, त्याच्या/तिच्या लैंगिक इच्छा, गरजा व वर्तन काय आहे, या सर्वांची गोळाबेरीज त्या व्यक्तीची लैंगिकता ठरवत असते.

- **लैंगिक कल** (Sexual Orientation)

एखादी व्यक्ती कोणत्या लिंगाच्या व्यक्तीशी (पुरुष किंवा स्त्री किंवा दोन्ही) दीर्घकाळ शारीरिक व भावनिक नातं प्रस्थापित करू शकते हा त्या व्यक्तीचा लैंगिक कल असतो. लैंगिक कल तीन प्रकारचे असू शकतात. भिन्नलिंगी (फक्त विरुद्ध लिंगाच्या व्यक्तींबद्दल भावनिक व शारीरिक आकर्षण), उभयलिंगी (समान व विरुद्ध लिंगाच्या व्यक्तींबद्दल भावनिक व शारीरिक आकर्षण) व समलिंगी (फक्त समान लिंगाच्या व्यक्तीबद्दल भावनिक व शारीरिक आकर्षण). वयात आल्यावर प्रत्येक व्यक्तीला जाणवतं की त्याला/तिला कोणत्या लिंगाच्या व्यक्तींबद्दल लैंगिक आकर्षण वाटतं. कोणा विशिष्ट लिंगाच्या व्यक्तीबरोबर लैंगिक संबंध केला तरच त्या व्यक्तीला तिचा लैंगिक कल कळतो असं नाही. याचा अर्थ असा की कोणाबरोबरही लैंगिक संबंध न करताही, वयात आल्यावर प्रत्येकाला

आपल्या लैंगिक कलाचं आकलन होतं.

- **भिन्नलिंगी** (Heterosexual)

जी व्यक्ती विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीबरोबर दीर्घकाळ शारीरिक व भावनिक नातं प्रस्थापित करू शकते अशा व्यक्तीला भिन्नलिंगी शब्द वापरला जातो. इंग्रजीमध्ये कधी-कधी, या व्यक्तींसाठी 'स्ट्रेट' हा शब्दही वापरला जातो.

- **समलिंगी** (Homosexual)

डिक्शनरीत दिलेला समलिंगी या शब्दाचा अर्थ- जी व्यक्ती तिच्या लिंगाच्या व्यक्तींकडेच लैंगिकदृष्ट्या आकर्षित होते, ती व्यक्ती.

- **गे** (Gay)

हा शब्द इंग्रजी असला तरी तो मराठीतही रूढ झाला आहे. जी व्यक्ती समान लिंगाच्या व्यक्तीबरोबर दीर्घकाळ शारीरिक व भावनिक नातं प्रस्थापित करू शकते, अशा व्यक्तीला 'गे' (समलिंगी) हा शब्द वापरला जातो. समलिंगी स्त्रियांसाठी 'लेस्बियन' हा शब्द वापरला जातो. समलिंगी व्यक्तींसाठी 'गे' किंवा समलिंगी शब्द वापरावा.

- **लेस्बियन** (Lesbian)

हा शब्द इंग्रजी आहे पण तो मराठीतही रूढ झाला आहे. जी स्त्री फक्त स्त्रीबरोबर दीर्घकाळ शारीरिक व भावनिक नातं प्रस्थापित करते अशा स्त्रीला 'लेस्बियन' म्हणतात. काही स्त्रिया स्वत:ला 'गे' हा शब्द वापरतात किंवा 'समलिंगी स्त्री/गे स्त्री' असा शब्दही वापरतात. या व्यक्तींसाठी 'होमो' शब्द वापरू नये.

- **समलिंगी व्यक्तींचा द्वेष** (Homophobia)

काही जणांमध्ये समलिंगी पुरुष/स्त्रियांबद्दल भीती असते व भीतीतून त्यांच्यामध्ये, समलिंगी पुरुष/स्त्रियांबद्दल द्वेष निर्माण होतो. समलिंगी व्यक्तींचा द्वेष हा या समाजाबद्दल असहिष्णुता व पूर्वग्रहदूषित दृष्टी दर्शवतो.

- **क्लोजेट** (Closet)

'क्लोजेट'ला मराठीत प्रतिशब्द नाही. 'क्लोजेट' म्हणजे जी व्यक्ती स्वत:च्या लैंगिक कलाबद्दल किंवा लिंगभावाबद्दल इतरांना सांगत नाही, तिची लैंगिकता गोपनीय ठेवते, आपल्या वर्तनाने, जीवनपद्धतीतून ती समाजमान्य चौकटीतील आहे (उदा. भिन्नलिंगी, विवाहित इत्यादी) असं भासवते अशा व्यक्तीला 'क्लोजेट'मध्ये आहे असं म्हणतात.

- **कमिंग आऊट** (Coming Out)

'कमिंग आऊट' ला मराठीत प्रतिशब्द नाही. 'कमिंग आऊट' हा एक आयुष्यभराचा प्रवास आहे, जिथे एखादी व्यक्ती आपली लैंगिकता स्वीकारते व मग यातील काहीजण त्यांची लैंगिकता इतरांना सांगू लागतात. 'कमिंग आऊट'चा अर्थ सर्वजणच आपली लैंगिकता सार्वजनिकरीत्या जाहीर करतील असं नाही.

- **आऊट** (Out)

'आऊट'ला मराठीत प्रतिशब्द नाही. जी व्यक्ती खाजगी आयुष्यात किंवा सार्वजनिक जीवनपद्धतीत किंवा व्यवसायात स्वत:ला गे/लेस्बियन/बायसेक्शुअल किंवा ट्रान्सजेंडर म्हणते ती व्यक्ती 'आऊट' आहे असं आपण म्हणतो. उदा. अशोक राव कवी (भारतातील पहिले 'गे' ॲक्टिव्हिस्ट) हे 'आऊट' आहेत कारण सार्वजनिक जीवनपद्धतीत ते स्वत: 'गे' आहेत असं उघडपणे सांगतात.

- **ड्रॅग क्वीन** (Drag Queen)

जो समलिंगी पुरुष दुसऱ्या पुरुषाला आकर्षित करण्यासाठी स्त्रियांचे कपडे घालतो अशा पुरुषांना 'ड्रॅग क्वीन' म्हणतात.

- **उभयलिंगी व्यक्ती** (Bisexual)

जी व्यक्ती पुरुष किंवा स्त्रीशी दीर्घकाळ शारीरिक व भावनिक नातं प्रस्थापित करू शकते, अशा व्यक्तीला उभयलिंगी म्हणतात. उभयलिंगी व्यक्ती, स्त्री आणि पुरुषांबद्दलचं हे आकर्षण आयुष्यात विविध प्रकारे अनुभवू शकतात.

या आकर्षणाच्या तीव्रतेत बदल होऊ शकतो. दोन्ही लिंगाच्या व्यक्तींबरोबर लैंगिक संबंध केले तरच ती व्यक्ती उभयलिंगी असते असं नाही. कोणाबरोबरही लैंगिक संबंध न करताही उभयलिंगी व्यक्तीला पुरुष व स्त्रीबद्दल लैंगिक व भावनिक आकर्षण असू शकतं.

- **उभयलिंगी व्यक्तींचा द्वेष/भीती** (Biphobia)

अनेक वेळा असं दिसतं, की उभयलिंगी व्यक्तींबद्दल वाटणारी भीती या समाजाबद्दल प्रचलित असलेल्या गैरसमजुतीतून व या शब्दाशी जोडल्या गेलेल्या समाजमान्य नसलेल्या वर्तनाशी निगडित असते. उदा. अनेक जोडीदार असणं, लैंगिक आजार/एचआयव्हीचा प्रसार इत्यादी. उभयलिंगी व्यक्तींचा द्वेष हा या समाजाविषयी असहिष्णुता व पूर्वग्रहदूषित दृष्टी दर्शवतो.

- **जेंडर** (Gender)

'जेंडर' हा शब्द पुरुष किंवा स्त्री गुणवैशिष्ट्य दर्शवतो. त्या व्यक्तीने घेतलेली सामाजिक भूमिका व वर्तन दर्शवतो.

- **ट्रान्सवेस्टाईट** (Transvestite)

ज्या पुरुषांना स्त्रीचे कपडे घालायला आवडतात, ज्यांचा लिंगभाव पुरुषाचा असतो व लैंगिक कल बहुतांशी जणांचा भिन्नलिंगी असतो अशांना 'ट्रान्सवेस्टाईट' म्हणतात. 'ट्रान्सवेस्टाईट'ला मराठी शब्द नाही म्हणून हाच शब्द मराठीत वापरावा.

- **जेंडर डिसफोरिया** (Gender Dysphoria) [2]

हा शब्द जसाच्या तसा मराठीत वापरावा कारण त्याच्या जवळचा शब्द मराठीत नाही. ज्या व्यक्तीचं शारीरिक लिंग व त्याचा लिंगभाव एकमेकांशी जुळणारा नसतो. (म्हणजे जी व्यक्ती शरीराने पुरुष आहे पण लिंगभाव स्त्रीचा आहे/जी व्यक्ती शरीराने स्त्री आहे पणं लिंगभाव पुरुषाचा आहे) अशांना 'जेंडर डिसफोरिया' आहे असं मानसोपचारतज्ज्ञ म्हणतात. आपली ओळख आपल्या शारीरिक लिंगानुरूप न होता ती लिंगभावानुरूप व्हावी; आपल्या शरीरामध्ये औषधं/शस्त्रक्रियेच्या मदतीने बदल घडवून, आपल्या

लिंगभावानुसार आपलं शरीर घडवावं, ही दृढ इच्छा असणं, अशा विविध प्रकारे 'जेंडर डिसफोरिया' व्यक्त होतो.

- **ट्रान्सजेंडर, ट्रान्ससेक्शुअल**

बघा प्रकरण, 'ट्रान्सजेंडर व्यक्तींबद्दल'

- **इंटरसेक्स** (Intersex) (द्विलिंगी) [3]

गुणसुत्र / गोनाड्स / बाह्य जननेंद्रियांमधील / आंतरिक जननेंद्रियांमधील वैविध्यामुळे ज्या व्यक्तींचं लिंग निश्चितपणे पुरुषाचं आहे का स्त्रीचं आहे हे समजणं अवघड होतं, अशा व्यक्तींना 'इंटरसेक्स' म्हणतात. पूर्वी इंग्रजीमध्ये यांना 'हरमॅफ्रोडाईट' हा शब्द वापरायचे. आता हा शब्द वापरू नये. 'इंटरसेक्स'ला मराठीत द्विलिंगी हा शब्द आहे.

- **एमएसएम** (MSM- Men who have Sex with Men)

एमएसएम म्हणजे 'मेन हु हॅव सेक्स वुईथ मेन' (पुरुषाबरोबर लैंगिक संबंध ठेवणारे पुरुष) जे पुरुष स्वत:ला 'गे' किंवा उभयलिंगी मानत नाहीत पण विविध कारणांसाठी ते पुरुषांबरोबर समलिंगी संभोग करतात अशांना एमएसएम म्हणतात. सहसा वैद्यकीय, एचआयव्ही/लैंगिक संसर्गजन्य आजारांच्या संदर्भात एमएसएम हा शब्द वापरला जातो. हा शॉर्टफॉर्म मराठीतही वापरू शकतो.

- **एलजीबीटी/जीएलबीटी** (LGBT/GLBT)

लेस्बियन, गे, बायसेक्शुअल आणि ट्रान्सजेंडर याचा शॉर्टफॉर्म एलजीबीटी (LGBT) असा आहे. लैंगिक अल्पसंख्याक समाजातील वैविध्य एकत्रितपणे दर्शविण्यासाठी एलजीबीटी किंवा जीएलबीटी हा शॉर्टफॉर्म वापरला जातो. जर हा शॉर्टफॉर्म वापरणार असाल, तर बातमीत जेव्हा तो प्रथम वापरला जाईल, तेव्हा त्याचा अर्थ प्रेक्षकांना/वाचकांना आवर्जून सांगावा नाहीतर त्यांना त्याचा अर्थ कळायला मार्ग नसतो.

- **क्विअर** (Queer)

पूर्वी (व आजही काही देशात) हा इंग्रजी शब्द हेटाळणीच्या सुरात वापरला जातो. एलजीबीटी समुदायाचे काही जण हा शब्द अभिमान दाखवण्यासाठी वापरतात. पण हा शब्द वापरण्यात या समुदायामध्ये मतभेद आहेत. म्हणून हा शब्द वापरणं टाळावं. पण याला अपवाद आहे- जर एखादी व्यक्ती स्वत:ला 'क्विअर' म्हणत असेल किंवा हा शब्द ती बोलताना वापरत असेल तर हा शब्द वापरावा. (एलजीबीटीक्यू) मधील क्यू चा अर्थ 'क्विअर' असा होतो. याचे दोन अर्थ निघू शकतात. 'क्विअर' म्हणजे, जी व्यक्ती समाजाच्या भिन्नलिंगी स्त्री- पुरुषांच्या चौकटीत बसत नाही, अशी व्यक्ती किंवा त्याचा दुसरा अर्थ असा, की जी व्यक्ती स्वत:ची लैंगिकता शोधत आहे, स्वत:च्या लैंगिकतेबद्दल प्रश्न विचारत आहे, अशी व्यक्ती.

- **अभिमान पदयात्रा** (Pride Walk/March)

साऱ्या जगात व भारतात लैंगिक अल्पसंख्याक समाज दरवर्षी अभिमान पदयात्रा काढतात. आपल्या अस्तित्वाची व अधिकारांची इतरांना जाण करून देणं, आपली लैंगिकता न लाजता, न घाबरता, अभिमानाने लोकांसमोर जाहीर करणं ही या पदयात्रेची उद्दिष्टं असतात. अशा पदयात्रेत लोक रंगीबेरंगी पोशाख घालतात. जे 'आऊट' नाहीत ते विविध प्रकारचे मुखवटे घालतात. या पदयात्रेत इंद्रधनुष्यी रंगाचा झेंडा वापरला जातो. (हा झेंडा विविध रंगांचा असल्यामुळे लैंगिकतेचं प्रतीक मानला जातो)

- **इंद्रधनुष्यी रंगाचा झेंडा** (Rainbow Flag) [4]

इंद्रधनुष्यी रंगाचा झेंडा हा, 'गे' समाजाचा अभिमान दर्शविणारा मानला जातो. विविध रंग असल्यामुळे तो अनेक वेळा एलजीबीटी लैंगिकतेतील

वैविध्य दर्शविणाराही मानला जातो. १९७० च्या दशकात याचा वापर होऊ लागला. (या रंगाचा दुसराही अर्थ होतो- शांती (Peace). शांतीचं प्रतीक म्हणून हा झेंडा वापरला जातो.) या झेंड्याचा वापर एलजीबीटी अभिमान पदयात्रेत केला जातो.

- **द डायग्नोस्टिक अँड स्टॅटिस्टिकल मॅन्युअल ऑफ डिसऑर्डर्स** (DSM) [5]- **'समलैंगिकता मानसीक आजार नाही.'**

अमेरिकेत 'अमेरिकन सायकिॲट्रिक असोसिएशन' (APA) चं 'DSM मॅन्युअल' प्रकाशित होतं. यात विविध मानसिक आजारांची वर्गवारी केलेली आहे. मानसिक आजारांचं वर्णन करण्यासाठी सर्वत्र समान शब्द वापरले जावेत, सर्व मानसोपचारतज्ज्ञांची विविध मानसिक आजारांकडे बघण्याची दृष्टी एकसारखी असावी हा या मॅन्युअलचा हेतू आहे. मानसोपचारतज्ज्ञ, डॉक्टर, संशोधक, मानसिक आजारांवरच्या औषधांवर नियंत्रण ठेवणाऱ्या सरकारी/बिगर सरकारी यंत्रणा,आरोग्यविमा, संस्था, औषधं तयार करणारे उद्योग समूह, कायदा व्यवस्था व आरोग्य/कायद्याची धोरणं बनवणाऱ्या सरकारी यंत्रणा या मॅन्युअलचा उपयोग करतात. या मॅन्युअलबरोबर 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन'(WHO)च्या 'इंटरनॅशनल स्टॅटिस्टिकल क्लासिफिकेशन ऑफ डिसीजेस ॲन्ड रिलेटेड हेल्थ प्रॉब्लेम्स' (ICD) या पुस्तकाचाही आधार घेतला जातो. १८ मे २०१३ पासून DSM ची पाचवी आवृत्ती प्रसिद्ध झाली. समलैंगिकता मानसिक आजाराच्या यादीतून काढून टाकली जावी, अशी मागणी १९७० च्या दरम्यान झाली. त्यानंतर समलैंगिकता मानसिक आजारांच्या यादीतून काढून टाकण्यात आली. पण परत १९७४ साली DSM II मध्ये समलैंगिकतेला आजारांच्या यादीत घालण्यात आलं. १९८७ साली DSM III-R च्या आवृत्तीत समलैंगिकतेला मानसिक आजाराच्या यादीतून कायमचं वगळण्यात आलं.

- **द इंटरनॅशनल स्टॅटिस्टिकल क्लासिफिकेशन ऑफ डिसीजेस ॲन्ड रिलेटेड हेल्थ प्रॉब्लेम्स (ICD).**

अजून एक आजारावरचं पुस्तक वापरलं जातं, ते म्हणजे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन(WHO)चं ICD. ICD आणि DSM मध्ये महत्त्वाचा फरक असा की DSM हे फक्त मानसिक आजारांवरचं पुस्तक आहे तर ICD सर्व (मानसिक व शारीरिक) आजारांवरचं पुस्तक आहे. अमेरिकेत DSM वापरलं जातं तर युरोपात व इतर देशात ICD वापरलं जातं. १९९२ मध्ये वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने समलैंगिकतेला मानसिक आजारांच्या यादीतून काढून टाकलं.

- **इंडियन सायकिॲट्रिक सोसायटी**

२०१४ च्या सुरुवातीला इंडियन साइकिॲट्रिक सोसायटीनं समलैंगिकता मानसिक आजार नाही, हे घोषित केलं.

****

# ट्रान्सजेंडर व्यक्तींबद्दल [6]

- **ट्रान्सजेंडर** (Transgender)

जी व्यक्ती जन्माने पुरुष आहे व जिचा लिंगभाव स्त्रीचा आहे/जी व्यक्ती जन्माने स्त्री आहे व जिचा लिंगभाव पुरुषाचा आहे, अशांना ट्रान्सजेंडर म्हणतात. याचा अर्थ ज्या व्यक्तीचं शारीरिक लिंग व त्याचा/तिचा लिंगभाव एकमेकांशी जुळणारे नाहीत (वेगवेगळे आहेत) अशांना आपण ट्रान्सजेंडर म्हणतो. जी व्यक्ती जन्माने पुरुष आहे व जिचा लिंगभाव स्त्रीचा आहे, अशा स्त्रीला 'ट्रान्सवुमन' म्हणतात; जी व्यक्ती जन्माने स्त्री आहे व जिचा लिंगभाव पुरुषाचा आहे अशा पुरुषाला 'ट्रान्समॅन' म्हणतात.

- **थर्ड जेंडर/तृतीयपंथी** (Third Gender)

ज्या व्यक्ती जन्माने पुरुष आहेत व ज्यांचा लिंगभाव स्त्रीचा आहे (मेल टु फिमेल ट्रान्सजेंडर) अशा व्यक्तींना मराठी/हिंदीमध्ये 'तृतीयपंथी' शब्द वापरतात. काही 'मेल टु फिमेल' ट्रान्सजेंडर, काही 'फिमेल टु मेल' ट्रान्सजेंडर व काही इंटरसेक्स व्यक्ती आपण पुरुषही नाही आणि स्त्रीही नाही असं मानतात. ते 'थर्ड जेन्डर' हा शब्द वापरतात. भारतासारख्या देशात 'थर्ड जेन्डर' (तृतीयपंथी) या लिंग नामाला सुप्रीम कोर्टाने कायदेशीर मान्यता दिली आहे.

- **लिंगबदल प्रक्रिया** (Transition)

जेव्हा एखादी ट्रान्सजेंडर व्यक्ती औषधं/शस्त्रक्रिया करून शारीरिक बदल घडवून, पुरुषापासून स्त्री किंवा स्त्रीपासून पुरुष बनायचा प्रवास करू लागते, त्या काळाला 'ट्रान्झिशन' चा काळ म्हणतात. त्या प्रक्रियेला लिंगबदलाची प्रक्रिया म्हणतात.

- **ट्रान्ससेक्शुअल** (Transsexual)

ज्या ट्रान्सजेंडर व्यक्तीने औषधं/शस्त्रक्रियेमार्फत लिंगबदल केला आहे/लिंग बदलाची प्रक्रिया चालू आहे/ही प्रक्रिया सुरू करणार आहे, अशा व्यक्तीला ट्रान्ससेक्शुअल म्हणतात. ट्रान्ससेक्शुअलला मराठीत प्रतिशब्द नाही म्हणून हाच शब्द मराठीत वापरावा.

- **हिजडा समाज**

हिजडा समाज हा जन्माने पुरुष व लिंगभावाने स्त्री (मेल टू फिमेल ट्रान्सजेंडर) असलेल्या व्यक्तींचा समाज आहे. हिजडा समाजात विविध घराणी असतात. प्रत्येक घराण्यात 'चेले' व चेल्यांचे 'गुरू' असतात. ज्या मेल टु फिमेल ट्रान्सजेंडर व्यक्तीला हिजडा समाजात प्रवेश घ्यायचा असेल तिला, एखाद्या हिजडा घराण्यातील गुरूकडे 'रीत' (दिक्षा) घेऊन त्या गुरुचा चेला बनावं लागतं.

विविध प्रांतांत हिजडा शब्दाला विविध नावं आहेत. महाराष्ट्रात 'हिजडा' शब्द वापरतात; दिल्लीत 'किन्नर' शब्द वापरतात व तामिळनाडूमध्ये 'आरवाणी' हा शब्द वापरतात.

हिजडा समाजातील व्यक्ती दारोदार पैसे मागून (मंगती करणं) लग्नात नाचून व गाऊन (बधाई), बारशात नवजात बालकास आशीर्वाद देऊन पैसे कमावतात. अशा प्रकारे पैसे मिळवून उदरनिर्वाह करणं, हा त्यांच्या परंपरेचा भाग आहे. काहीजण वेश्याव्यवसाय करतात. फार थोडे हिजडे नोकरी किंवा सामाजिक संस्थांमध्ये काम करतात. जोर-जबरदस्तीने लोकांकडून पैसे उकळणं (उदा. बागेमध्ये, लोकलमध्ये, रस्त्यात, दुकानात इत्यादी.), चोऱ्यामाऱ्या करणं हा त्यांच्या परंपरेचा भाग नाही. अशा वर्तनाला कोणत्याही परंपरेचा आधार नाही, मान्यता नाही.

## ट्रान्सजेंडर व हिजडा समाज यातील फरक

| ट्रान्सजेंडर | हिजडा |
|---|---|
| १. ट्रान्सजेंडर हा शास्त्रीय शब्द आहे. | १. हिजडा हा सांस्कृतिक शब्द आहे. |
| २. ट्रान्सजेंडर दोन प्रकारचे असतात.<br>(I) मेल टु फिमेल (ट्रान्सविमेन)<br>(II) फिमेल टु मेल (ट्रान्समेन) | २. हिजडा समाज मेल टु फिमेल (ट्रान्सविमेन) व्यक्तींचा असतो. |
| ३. काही मेल टु फिमेल ट्रान्सजेंडर (ट्रान्सविमेन) हिजडा समाजात नाव नोंदणी करत नाहीत म्हणजे रीत घेत नाहीत. याचा अर्थ सर्व मेल टु फिमेल ट्रान्सजेंडर व्यक्ती हिजडा समाजातले नसतात. | ३. हिजडा समाजातील सर्व व्यक्ती मेल टु फिमेल ट्रान्सजेंडर (ट्रान्सविमेन) असतात. |
| ४. ट्रान्सजेंडरला संस्कृतीतून आलेली परंपरा, रीतीरिवाज नाहीत. | ४. हिजडा समाजाला ऐतिहासिक, सांस्कृतीक, व्यावसायिक परंपरा, रीतीरिवाज आहेत. |

****

# दोन महत्त्वाचे निकाल

- **भारतीय दंडविधान संहिता (भा.दं.सं.) कलम ३७७, 'नाझ फाऊंडेशन (इंडिया) ट्रस्ट' ची जनहित याचिका.**

(Govt. of NCT of Delhi and Ors (160 DLT 277 (2009) Delhi High Court). [7]

भा.दं.सं. कलम ३७७, १८६० साली अस्तित्वात आलं. या कलमानुसार ज्या संभोगातून प्रजनन होणार नाही (उदा. लिंग–मुखमैथुन, लिंग–गुदमैथुन) अशा संभोग करणाऱ्यांना १० वर्षापर्यंत शिक्षा ठोठावली गेली आहे.

हे कलम लागू होण्यासाठी लिंगप्रवेश होणं आवश्यक आहे. (उदा. लिंग–गुदमैथुन, लिंग–मुखमैथुन). हे कलम पुरुष–स्त्री व पुरुष–पुरुष मुखमैथुन व गुदमैथुनाला लागू होतं. **हे कलम दोन स्त्रियांमधील लैंगिक संबंधांना लागू होत नाही.**

२००१ साली 'नाझ फाऊंडेशन (इंडिया) ट्रस्ट' ने (ही दिल्लीतील एक सामाजिक संस्था आहे जी समलिंगी व तृतीयपंथीयांमध्ये एचआयव्हीचा प्रसार होऊ नये यासाठी कार्य करते.) दिल्ली हायकोर्टात एक जनहित याचिका दाखल करून ३७७ हे असंविधानिक आहे असा दावा केला. कलम २१ मध्ये अंतर्भूत असलेले आरोग्य व खाजगी आयुष्य जगण्याचे अधिकार, कलम १४ व १५ मध्ये अंतर्भूत असलेलं कायद्याचं संरक्षण व समान संधीचे अधिकार, कलम १९ मध्ये अंतर्भूत असलेलं वैचारिक प्रकटीकरणाचं स्वातंत्र्य या सर्व अधिकारांचं उल्लंघन ३७७ कलम करतं.

२ जुलै २००९ ला दिल्ली हायकोर्टानी भा.दं.सं. ३७७ कलमातला

जो भाग, प्रौढांमधील संमतीने, खाजगीत केलेल्या समलिंगी संबंधांना गुन्हा ठरवतो तो भाग असंविधानिक आहे असं घोषित केलं. ३७७ कलमातील जो भाग संमती नसताना/बळजबरीने केलेल्या संबंधांना गुन्हा ठरवतो व जो भाग लहान मुलां/मुलींबरोबर लैंगिक संबंध करणं गुन्हा ठरवतो तो तसाच ठेवला. या निकालाविरुद्ध काही सनातनी विचारांच्या गटांनी सुप्रीम कोर्टात अपील केलं. ११ डिसेंबर २०१३ ला सुप्रीम कोर्टाचा निकाल लागेपर्यंत, दिल्ली हायकोर्टाचा निकाल लागू होता.

- **सुरेश कुमार कौशल यांचं अपील.**

Sureshkumar Kaushal & Others v/s Naz Foundation (India) Trust & Ors [ (2014) 1 SCC 1.]

२००९ साली सुरेशकुमार कौशल, व्यवसायाने ज्योतिषी, यांनी दिल्लीच्या ३७७ च्या निर्णयाविरुद्ध सुप्रीम कोर्टात अपील केलं. हे स्वत: मूळ केसमध्ये (दिल्लीच्या केसमध्ये) सहभागी नव्हते.

याच्यानंतर १४ विविध गटांनी दिल्लीच्या कलम ३७७ च्या निर्णयाविरुद्ध अपील केलं. यातील बहुतांशी सर्व धार्मिक गट होते.

भारत सरकारने या निर्णयावर अपील केलं नाही. भारत सरकारने सुप्रीम कोर्टात सांगितलं की दिल्ली हायकोर्टाच्या निकालात काही कायदेशीर चूक नाही. फेब्रुवारी व मार्च २०१२ मध्ये सरन्यायाधीश जी.एस. सिंगवी व सरन्यायाधीश एस.जे. मुखोपाध्याय यांच्या समोर सुनावणी झाली.

११ डिसेंबर २०१३ ला सुप्रीम कोर्टानी दिल्ली हायकोर्टाचा भा.दं.सं. ३७७ चा निकाल रद्दबातल केला. हे कलम विशिष्ट लैंगिकतेच्या समूहालाच (समलिंगी, तृतीयपंथी) फक्त लागू होत नाही,

तर सर्वांनाच लागू होतं. याचा अर्थ असा, की **लैंगिक कल किंवा लिंगभाव कोणताही असणं (उदा. समलिंगी असणं, तृतीयपंथी असणं) हा गुन्हा नाही, पण ३७७ कलम, त्यांच्या लैंगिक संबंधांना गुन्हा ठरवतं.**

- **ट्रान्सजेंडर/तृतीयपंथी अधिकारांसंदर्भातील निकाल** National Legal Services Authority v/s Union of India & Others [ Writ Petition (Civil) No. 400 of 2012 ('Nalsa')] [8]

१५ एप्रिल २०१४ ला सुप्रिम कोर्टाचे न्यायाधीश के.एस. राधाकृष्ण व ए. के. सिक्रि यांनी निकाल दिला की संविधानात नमूद केलेले अधिकार व स्वातंत्र्य ट्रान्सजेंडर्सनाही लागू आहेत. समाजात फक्त स्त्री वा पुरुष अशा दोनच लैंगिकतेचं अस्तित्व नसून तिसऱ्या प्रकारची लैंगिकता म्हणजे 'थर्ड जेंडर'/तृतीयपंथी या लैंगिकतेलाही कायदा मान्यता देतो. या समाजाचं अस्तित्व आपल्याला नाकारता येणार नाही.

नॅशनल लीगल सर्विसेस ॲथॉरिटीने ही याचिका, सप्टेंबर २०१२ ला सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. ट्रान्सजेंडर/तृतीयपंथीयांना इतरांसारखे समाजहक्क मिळावेत, कायद्याचं संरक्षण त्यांनाही असलं पाहिजे, विविध कागदपत्रांवर कायदेशीर दाखल्यांवर त्यांना त्यांचं लिंग 'थर्ड जेंडर' म्हणून देता आलं पाहिजे (उदा. मतदार ओळखपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, रेशनकार्ड इत्यादी.), त्यांना विविध शिक्षण सवलती, रूग्णालयात प्रवेश मिळवता आला पाहिजे इ. ही याचिका दाखल झाल्यावर लॉयर्स कलेक्टिव्हनं लक्ष्मीनारायण त्रिपाठी या हिजडा/ट्रान्सजेंडर ॲक्टिव्हिस्टसाठी एक 'इंटरव्हेंशन' दाखल केलं व मागणी केली, की प्रत्येक तृतीयपंथीला आपण स्त्री म्हणून ओळखलं जावं का पुरुष म्हणून ओळखलं जावं का तृतीयपंथी म्हणून ओळखलं

जावं, हे ठरवण्याचा अधिकार असला पाहिजे.

NALSA चा निकाल दोन महत्त्वाचे मुद्दे मांडतो– स्वातंत्र्य व समता. कोर्टानी सांगितलं, की कलम २१ च्या अंतर्गत प्रत्येकाला आपल्या पद्धतीने स्वत:ची जीवनपद्धती ठरवण्याचा व जगण्याचा अधिकार आहे, व हा निर्णय ज्याचा त्यानीच घ्यायचा आहे.

ट्रान्सजेंडर व्यक्ती औषधोपचार/शस्त्रक्रिया करोत वा न करोत, प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या लिंगभावानुसार त्याची लिंगओळख ठरवण्याचा अधिकार आहे. पुरुष, स्त्री किंवा 'थर्ड जेंडर'/तृतीयपंथी. न्यायालयाने कलम (१९) (अ) नुसार भारतीय नागरिकांचं लैंगिकतेच्या स्वीकाराचं स्वातंत्र्यही अबाधित राखलं– इतरांना असलेल्या वेषभूषेच्या बंधनांव्यतिरिक्त कोणतीही वेशभूषेची बंधनं ट्रान्सजेंडर/तृतीयपंथी व्यक्तीला लागू करता येणार नाहीत. वेगळ्या लिंगभावाचा आधार घेऊन भेदभाव करता येणार नाही असं न्यायालयानी स्पष्ट केलं आहे. सर्वांना कायद्याचा समान आधार/संरक्षण असलं पाहिजे.

या निकालात न्यायालयाने कलम १५ व १६ मध्ये 'सेक्स' या शब्दाचा अर्थ फक्त शारीरिक लिंग असा न लावता, त्याचा विस्तारित अर्थ लावला व त्यात 'लिंगभाव'ही येतो असं सांगितलं.

व्यक्तीचा लैंगिक कल कोणताही असो, त्याच्या/तिच्या लैंगिक कलाचा आधार घेऊन कोणावरही भेदभाव करता येणार नाही असं न्यायालयानी स्पष्ट सांगितलं .

****

# शब्द/विधानांचा वापर

## खालील शब्द/वाक्प्रचार टाळावेत

- **पर्यायी लैंगिकता** (Alternative Sexuality)

पर्यायी याचा अर्थ अनेक पर्याय आहेत व एखादा पर्याय निवडण्याचं व्यक्तीला स्वातंत्र्य आहे. **एलजीबीटी समाजाबद्दल 'पर्यायी लैंगिकता' असा उल्लेख करू नये** कारण या समाजातील व्यक्तींनी ही लैंगिकता जाणीवपूर्वक निवडली नाही, ती निसर्गाकडून त्यांना मिळाली आहे. हा शब्दप्रयोग करू नये.

- **छक्का** (Eunuch)

ऐतिहासिक दृष्टिकोन बघता, पूर्वी वयात यायच्या अगोदर काही लहान मुलांचं खच्चीकरण (Castration- मुलांचे वृषण काढून टाकणं) केलं जायचं (अशा मुलांना इंग्रजी शब्द 'युनक' वापरला जायचा). अशा व्यक्ती राजदरबारी राण्यांच्या महालात काम करायच्या. त्यांच्यापासून लैंगिकदृष्ट्या राण्या सुरक्षित असायच्या. **'छक्का' व इंग्रजीतला 'युनक' हे शब्द हिजडा व ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी उपहासात्मकदृष्ट्या वापरले जातात. हे शब्द कधीही वापरू नयेत.**

- **हरमॅफ्रोडाइट** (Hermophrodite)

गुणसुत्र / गोनाड्स / बाह्य जननेंद्रियांमधील / आंतरिक जननेंद्रियांमधील वैविध्यामुळे ज्या व्यक्तींचं लिंग निश्चितपणे पुरुषाचं आहे का स्त्रीचं आहे हे समजणं अवघड होतं, अशा व्यक्तींना 'इंटरसेक्स' म्हणतात. पूर्वी इंग्रजीमध्ये यांना 'हरमॅफ्रोडाईट' हा शब्द वापरायचे. हा शब्द अपमानास्पद आहे. तो वापरू नये. अशा व्यक्तींसाठी मराठीत

‘इंटरसेक्स’ किंवा द्विलिंगी शब्द वापरावा.

- **होमोसेक्शुअल** (Homosexual)

मराठीत ‘समलिंगी’ हा शब्द वापरलेला चालतो. पण इंग्रजीमध्ये या शब्दासाठी समान असलेला शब्द ‘होमोसेक्शुअल’ वापरू नये. इंग्रजी व **मराठीमध्ये ‘गे’, ‘लेस्बियन’ हे शब्द वापरावेत.**

- **होमो** (Homo)

‘गे’ शब्दाऐवजी काही जण ‘होमो’ हा शब्द वापरतात. उदा. समलिंगी नात्याच्या जोडप्यांना **‘होमो कपल/होमो जोडपं’ किंवा ‘होमोसेक्स करणारे’ असे शब्द वापरतात. ‘होमो’ हा शब्द द्वेष व्यक्त करण्यासाठी किंवा चेष्टेसाठी वापरला जातो म्हणून ‘होमो’ हा शब्द कधीही वापरू नये.**

होमोसेक्स/होमोसेक्शुअल सेक्स/गे सेक्स असे शब्द न वापरता समलिंगी संबंध/समलैंगिक वर्तन/समलिंगी प्रेम असे शब्द वापरावेत.

- **समलिंगी लक्षण**

समलैंगिकता हा लैंगिकतेचा प्रकार आहे, तो कोणत्या आजाराचे लक्षण नाही की बरा करता येईल. **‘समलिंगी लक्षण’ असा शब्दप्रयोग करू नये.** उदा. ‘त्याच्यात समलिंगी असण्याचं लक्षण होतं.’ असं विधान करू नये.

- **समलिंगी बनणं/समलिंगी बनवणं**

कुणीही अनुभवाने किंवा बळजबरी करून समलिंगी बनू शकत नाही. त्यामुळे **‘समलिंगी बनणं/समलिंगी बनवणं’, अशी शब्दयोजना करू नये.**

- **समलिंगी संबंधांची सवय लागणं/व्यसन जडणं**

समलिंगी संबंध एकतर आपली लैंगिक इच्छा आहे म्हणून होतात किंवा बळजबरीतून होतात किंवा शरीरविक्रीसाठी होतात. हे काही दारू/नशेसारखं व्यसन नाही की त्याची सवय लागते किंवा व्यसन जडतं. त्यामुळे '**समलिंगी संबंधांची सवय लागणं/व्यसन जडणं**' असे शब्दप्रयोग वापरू नयेत.

- **या लाइनीत असणं**

काही वेळा समलिंगी संबंध करणाऱ्या व्यक्तीला 'या लाइनीत कधीपासून आहेस?' असं विचारलं जातं, तर काही वेळा ती व्यक्ती उत्तर देताना 'मी या लाइनीत नुकताच आलो' अशा प्रकारचं उत्तर देते. **समलिंगी असणं/किंवा समलिंगी नातं प्रस्थापित करणं हा व्यवसाय किंवा नोकरीचा भाग नाही म्हणून हा शब्दप्रयोग करणं चुकीचं आहे.**

- **एलजीबीटी समाजातील असल्याची कबुली देणं/मान्य करणं**

कबुली देणं/मान्य करणं याचा स्वर नकारात्मक– 'गुन्हा कबुल केल्या सारखा' असतो. उदा.'त्याने/तिने एलजीबीटी समाजाचा असल्याची कबुली दिली/मान्य केलं.' म्हणून **कबुली दिली/मान्य केलं असे शब्दप्रयोग करू नयेत.**

- **ती/त्या/त्यांच्या**

अनेक वेळा वर्तमानपत्रात एलजीबीटी समाजासाठी 'ती'/'त्या'/'त्यांच्या' अशा शब्दांनी संबोधलं जातं. उदा.'त्यांच्या व्यथा'. अशा शब्दप्रयोगातून हा समाज वेगळा/परका आहे, व्हिक्टिम (बळी) किंवा व्हिलन (खलनायक) आहे अशी भावना विनाकारण निर्माण होते. म्हणून असे शब्द टाळावे. हेच उदाहरण घेतलं तर वाक्य असं करता येईल 'तृतीयपंथीयांच्या व्यथा'.

- **'आऊट करणं'** (To Out)

कोणा व्यक्तीला 'आऊट' करणं म्हणजे त्या व्यक्तीची संमती नसताना ती

व्यक्ती समलिंगी/ ट्रान्सजेंडर/इंटरसेक्स आहे, हे सार्वजनिकरीत्या जाहीर करणं. काही वेळा, अफवेच्या आधारे, सार्वजनिकरीत्या असं 'आऊटिंग' केलं जातं. **अशा प्रकारे कोणाला 'आऊट' करू नये,** कारण (१) ती व्यक्ती निश्चितपणे त्याच लैंगिकतेची आहे का नाही हे माहीत नसतं व (२) काही व्यक्तींच्या घरच्यांना माहीत असतं, पण ही बाब प्रसारमाध्यमांतून जगजाहीर व्हावी, ही इच्छा नसते.

- **जीवनपद्धती** (Lifestyle)

बातम्यांमध्ये काही वेळा जीवनपद्धती हा शब्द वापरला जातो. काही वेळा त्याचा वापर योग्य असतो. काही वेळा मात्र तो चुकीच्या अर्थाने वापरला जातो. उदा. भिन्नलिंगी जीवनपद्धती व समलिंगी जीवनपद्धती या पूर्ण वेगळ्या आहेत असं दर्शवलं जातं. भिन्नलिंगी जीवनपद्धती म्हणजे भिन्नलिंगी व्यक्तीशी विवाह करणं, मूल होणं, इत्यादी मुद्दे मांडले जातात पण समलिंगी जीवनपद्धती म्हणजे एकटं राहणं, बायकी स्वभाव असणं, अनेक जोडीदार असणं, असे पैलू सुचवले जातात. त्यामुळे समलिंगी जीवनपद्धती कमी दर्जाची/अपूर्ण आहे व ती भिन्नलिंगी जीवनपद्धतीपेक्षा खूप वेगळी आहे हे सुचवणं चुकीचं आहे व गोंधळ निर्माण करणारं आहे. म्हणून हा शब्द जपून वापरावा.

- **लैंगिक आवड/निवड** (Choice/Preference)

काहीवेळा 'लैंगिक आवड/निवड' असे शब्दप्रयोग केले जातात. (उदा. 'त्याने समलिंगी जीवनपद्धतीची निवड केली' किंवा 'त्याला समलिंगी संबंधाची आवड आहे'). लैंगिक कल किंवा लिंगभाव हा आवडी/निवडीचा भाग नाही. तो निसर्गाने दिलेला पैलू आहे. त्यामुळे **आवड-निवड हे शब्द वापरू नयेत.**

- **लिंग बदलाची शस्त्रक्रिया**

लिंग बदलाची प्रक्रिया ही मोठी व गुंतागुंतीची प्रक्रिया असते. त्यात

समुपदेशन, औषधं व शस्त्रक्रियांचा समावेश असतो. ही सर्व प्रक्रिया होण्यास अनेक महिन्यांचा कालावधीही लागतो. म्हणून लिंग बदलाची शस्त्रक्रिया या शब्दप्रयोगापेक्षा लिंग बदलाची प्रक्रिया हे जास्त योग्य विधान आहे.

- **गुदमैथुनासंदर्भातील कायदे (‘सोडोमी लॉ’)**

काही देशातील कायद्यात विशिष्ट लैंगिक कृत्यं ही गुन्हा मानली जातात. पूर्वीपासून अशा प्रकारच्या कायद्याचा वापर ‘गे’ समाजातील लोकांना शिक्षा करण्यासाठी केला गेला आहे. हा कायदा भारतात भा.दं.सं. ३७७ कलमात दिसतो. **समलिंगी नाती दर्शवण्यासाठी किंवा लैंगिकतेचं वर्णन करण्यासाठी प्रसारमाध्यमांनी ‘सोडोमी’ हा शब्द कधीही वापरू नये.**

- **ट्रान्सजेंडर/तृतीयपंथी याच्यासाठी कोणते शब्दप्रयोग वापरावे ?**

पुढीलपैकी कोणतेही शब्दप्रयोग वापरण्यास हरकत नाही:
तृतीयपंथी व्यक्ती किंवा ट्रान्सजेंडर समाज किंवा तृतीयपंथी समाज.

- **व्यक्तीला कोणत्या लिंगानी संबोधित करायचं ?**

मुलाखतीत ज्या ट्रान्सजेंडर व्यक्तीचं मत घेतलं जात आहे, त्याला/तिला विचारावं, की त्याला/तिला पुल्लिंगी का स्त्रीलिंगी शब्दप्रयोग करून संबोधित करावं. उदा.१ एखादा फिमेल टु मेल ट्रान्सजेंडर म्हणेल, की त्याला तुम्ही ‘पुल्लिंगी’ शब्दप्रयोग करून संबोधित करावं. उदा. २ एखादी हिजडा समाजातील व्यक्ती स्त्रीवेशात असेल, नाव पुरुषाचं सांगेल आणि तिला स्त्रीलिंगी शब्दप्रयोग करून संबोधित करावं असं सांगेल.

- **फोटो**

या समाजाचे फोटो देताना सर्वसामान्य पोषाख केलेल्यांचे फोटो द्यावेत. भडक, लक्ष वेधून घेणारे फोटो सर्वसामान्यांमध्ये भीती व अस्वस्थता निर्माण करतात.

****

# तपासायचे मुद्दे

बातमी देण्याअगोदर खालील गोष्टी तपासून घ्याव्यात.

| विषय | चुकीचा संदर्भ | विश्लेषण |
|---|---|---|
| लहान मुलांचं लैंगिंक शोषण | गे पुरुष लहान मुलांचं लैंगिक शोषण करतात. | **कोणत्याही लैंगिकतेचा पुरुष एळाद्या लहान मुला/मुलीचं लैंगिक शोषण करू शकतो.** लैंगिक शोषण हा गुन्हा आहे. हमसफर ट्रस्ट, समपथिक ट्रस्ट सारख्या संस्था लहान मुलांच्या अधिकारांचं रक्षण करतात व अशा संस्थांकडे लहान मुलांच्या संरक्षणासाठी धोरणही तयार केलेलं आहे. |
| | लहानपणी लैंगिक शोषण झाल्यामुळे ती मुलं समलिंगी बनतात. | लैंगिक कल हा जन्मापासून बनलेला असतो. (पण ती व्यक्ती वयात आल्याशिवाय तिला त्याची उमज येत नाही), **लैंगिक शोषणाने एखादी व्यक्ती गे बनत नाही.** |
| समलैंगिकता ही परिस्थितीजन्य असते. | जर स्त्रिया उपलब्ध नसतील तर पुरुष समलिंगी बनतो व | **लैंगिक कल व लैंगिक वर्तन या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.** लैंगिक कल, मग तो समलिंगी/ |

| | | |
|---|---|---|
| | पुरुषांशी संबंध करतो. उदा. वसतिगृह, लष्कर, तुरुंग, स्थलांतरित कामगार इ. | भिन्नलिंगी/उभयलिंगी असो, हा जन्मजात असतो. लैंगिक वर्तन लैंगिक कलानुसार असू शकतं किंवा परिस्थितीजन्य असू शकतं. |
| सर्व समलिंगी पुरुषात स्त्रियांचे बायकी गुण असतात. | सर्व समलिंगी पुरुष बायकी असतात. | जसं भिन्नलिंगी पुरुषांतही काही जणं पुरुषी असतात व काही बायकी असतात, तसंच गे पुरुषांमध्येही काही पुरुषी असतात तर काही बायकी. सर्व गे पुरुष बायकी असतात हा एक 'स्टिरिओटाइप' (चाकोरीबद्ध प्रतिमा) बनलेला आहे. |
| सर्व लेस्बियन्स मध्ये पुरुषी गुणवैशिष्ट्ये असतात.<br>सर्व लेस्बियन्स पुरुषी कपडे घालतात. | लेस्बियन स्त्रिया पुरुषांसारख्या असतात. | जसं भिन्नलिंगी स्त्रियांतही काही जणी बायकी असतात व काही पुरुषी असतात. तशा लेसबियन्सही काही बायकी तर **काही पुरुषी असतात. सर्व लेसबियन्स पुरुषी असतात हा एक 'स्टिरिओटाईप' (चाकोरीबद्ध प्रतिमा) बनलेला आहे.** |
| समलिंगी संबंध | समलिंगी लैंगिक आकर्षण व संभोग | सर्व संस्कृतीत लैंगिक संबंध हे प्रजोत्पादनासाठी आहेत हे |

| | | |
|---|---|---|
| | हे अनैसर्गिक आहे, निसर्ग नियमाविरुद्ध आहे. | अधोरेखित केलं गेलं आहे. पण वस्तुस्थिती पाहिली तर अनेकजण ज्याच्या त्याच्या आवडीने/इच्छेनुसार लैंगिक अनुभव घेतात. (त्या लैंगिक इच्छा, अनुभवांबद्दल उघडपणे बोलत नाहीत इतकंच.) |
| अधिकार | लैंगिक अल्पसंख्याक समाज स्वत:साठी विशेष अधिकार मागत आहेत. | लैंगिक अल्पसंख्याक स्वत:साठी विशेष अधिकार मागत नाहीत. जे अधिकार भारताच्या संविधानाने दिले आहेत त्याच चौकटीतले अधिकार, ते या देशाचे नागरिक म्हणून मागत आहेत. |
| हिजडा समाजाच्या व्यक्ती इंटरसेक्स लैंगिकतेच्या असतात. | हिजडा समाजाच्या व्यक्तींना जन्मत: दोन्ही लिंगाचे (स्त्री व पुरुष) अवयव असतात. | हिजडा हे जन्मानी पुरुष व मानसिकदृष्ट्या स्वत:ला स्त्री मानणाऱ्या (ट्रान्सजेंडर) व्यक्तींचा समाज आहे. हिजडा समाजातील व्यक्ती जन्माने पुरुष असले, तरी त्यांचा लिंगभाव स्त्रीचा असतो. इंटरसेक्स व्यक्ती क्वचितच हिजडा समाजात 'रीत' घेतात. हिजडे 'मंगती' करून (दारोदारी पैसे मागून) लग्नात नाचून, गाऊन,बारशाच्या |

| | | |
|---|---|---|
| | | वेळी नवजात बालकास आशीर्वाद देऊन ते पैसे कमावतात. अशा प्रकारे पैसे मिळवून उदरनिर्वाह करणं हा त्यांच्या परंपरेचा भाग आहे. |
| समलैंगिकता समाजात वाढू लागली आहे. लैंगिक वर्तनाला इंटरनेट कारणीभूत आहे. | लैंगिक अल्पसंख्याक समाज वाढू लागला आहे. | समलिंगी व इतर अल्पसंख्याक समाजाचं अस्तित्व हजारो वर्षांपासून आहे. पण समाजाच्या नकारात्मक दृष्टीमुळे या समाजांने उघडपणे आपले अधिकार मागितले नव्हते. आता ते संघटित होऊ लागले आहेत व आपल्यालाही सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, हे उघडपणे सांगू लागले आहेत. **समाजात समलिंगी समाजाची वाढ होत नाहीये. जे 'क्लोझेट'मध्ये होते (ज्यांनी आपली लैंगिकता जाहीर केली नव्हती) ते हळूहळू 'आऊट' होऊ लागले आहेत. (उघडपणे आपली लैंगिकता सांगू लागले आहेत).** कोणी आपण एलजीबीटी समाजाचा भाग |

| | | |
|---|---|---|
| | | आहोत हे सांगितलं म्हणजे हा 'फॅशन ट्रेंड' झालाय असं म्हणणं चुकीचं आहे. |
| गेइझम ('गेगिरी') | काही जण 'गेगिरी' करतात. | 'ॲक्टिव्हिझम'साठी हा शब्द वापरू नये. दुसरी महत्त्वाची गोष्ट, एलजीबीटी समाजातील प्रत्येक व्यक्ती एलजीबीटी चळवळीतील असते, तिला एलजीबीटी बाबतीत राजकीय दृष्टिकोन असतो व इतरांना ती तो दृष्टिकोन सांगायचा प्रयत्न करते असं नाही. |
| काही मानसोपचार तज्ज्ञांची या विषयाबद्दलची मतं नकारात्मक असतात. अशा मतांना अवास्तव महत्त्व दिलं जातं. | काही मानसोपचारतज्ज्ञ मानतात, की समलिंगी लैंगिक कल हा मानसिक आजार आहे, अशा व्यक्तींचं समुपदेशन केलं पाहिजे. | हे मानसोपचारतज्ज्ञ एकतर अज्ञानी आहेत. नाहीतर, जाणूनबुजून त्यांची वैयक्तिक पूर्वग्रहदूषित मतं इतरांवर लादत आहेत.अमेरिकन सायकिॲट्रिक असोसिएशनचं DSM मॅन्युअल (DSM-V) व वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) चं ICD मॅन्युअल समलिंगी लैंगिक कलाला आजार मानत नाहीत. इंडियन सायकिॲट्रिक सोसायटीनेही स्पष्टपणे सांगितलं की समलैंगिकता आजार नाही. |

| | | |
|---|---|---|
| काही डॉक्टरांची या विषयाबद्दल मतं नकारात्मक असतात. अशा मतांना अवास्तव महत्त्व दिलं जातं. | काही डॉक्टर या विषयाबद्दल अज्ञानी असल्यामुळे समलिंगी लैंगिक कल हा मानसिक आजार आहे असं सुचवतात. | भारतातल्या वैद्यकीय शिक्षणात लैंगिकता हा स्वतंत्र विषय नसतो, त्यामुळे बहुतेक डॉक्टरांना, भिन्नलिंगी लैंगिकता सोडली तर इतर लैंगिक अल्पसंख्याकांच्या लैंगिकतेचं अल्प ज्ञान असतं. म्हणून काहींना समलैंगिकता हा मानसिक आजार वाटतो. |
| बलात्कार | पुरुष व तृतीयपंथीयांवर बलात्कार होऊ शकत नाही. | बलात्कार व लैंगिक अत्याचार कोणत्याही व्यक्तीवर होऊ शकतो. स्त्री असो, पुरुष असो वा तृतीयपंथी असो. **काही तृतीयपंथीयांवर व समलिंगी पुरुषांवरही बलात्कार होतो.** |
| वेश्याव्यवसाय | अनेक गे पुरुष सार्वजनिक ठिकाणी भेटतात, जोडीदार शोधतात व जोडीदाराबरोबर लैंगिक संबंध प्रस्थापित करतात म्हणजे ते वेश्याव्यवसाय करतात. | वेश्याव्यवसाय म्हणजे संभोगाच्या बदल्यात पैसे किंवा इतर कोणत्यातरी वस्तूची देवाणघेवाण करणं. **पैसे किंवा इतर वस्तूची देवाणघेवाण न करता, प्रौढांनी जोडीदार शोधून, संमतीने लैंगिक संबंध करण्याला वेश्याव्यवसाय म्हणू नये.** |

| | | |
|---|---|---|
| या समाजांमुळे एचआयव्हीचा प्रसार होतो. | समलिंगी, ट्रान्सजेंडर व हिजडा समाजात एचआयव्हीचं प्रमाण जास्त आहे. याला कारण त्यांचं 'अनैतिक' वर्तन आहे हे सुचवणं. | शरीरविक्री करणाऱ्या स्त्रिया, ट्रकर्स, स्थलांतरित कामगार, पुरुषांबरोबर लैंगिक संबंध ठेवणारे पुरुष व हिजडा समाज यांना 'हाय रिस्क' (एचआयव्ही होण्याची जास्त शक्यता असलेले) समूह मानले जातात. त्याचा अर्थ असा नाही की हे समुदाय एचआयव्हीच्या प्रसाराला कारणीभूत आहेत. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेचे (NACO) आकडे पाहिले तर ८७.४% एचआयव्हीचा प्रसार हा असुरक्षित भिन्नलिंगी लैंगिक संबंधांतून होताना दिसतो व १.३% एचआयव्ही चा प्रसार हा समलिंगी असुरक्षित लैंगिक संबंधातून होताना दिसतो. [9] |
| सामाजिक, आर्थिक परिस्थिती | समलिंगी संबंध हे एकतर उच्च वर्गातील व्यक्ती करतात किंवा अशिक्षित, वंचित, गरीब, हलाखीच्या समाजातील व्यक्ती | असं मत बनायचं कारण, हे आहे की काही मान्यवर व्यक्ती आपण उघडपणे समलिंगी आहोत, असं सांगतात. तर दुसरीकडे समलिंगी आकर्षण असणं, समलिंगी लैंगिक संबंध करणं हा आजार/ विकृती आहे अशा दूषित |

| | | |
|---|---|---|
| | करतात. सुशिक्षित मध्यमवर्गातील समाजात हे होत नाही. | दृष्टिकोनामुळे अशी लोकं अशिक्षित, वंचित समाजातील असणार, अशी विचारसरणी मध्यमवर्गात दिसते. |

***

# दृष्टिकोनाची तपासणी

आमचं सर्वेक्षण [10] असं दाखवतं की प्रसारमाध्यमं काही ठरावीक/साचेबद्ध चौकटीतून या विषयाकडे बघतात. या दृष्टिकोनातून लैंगिक अल्पसंख्याकांची मांडणी होते. वृत्त संपादकांसाठी खाली दिलेले दृष्टिकोन उपयोगी पडतील. आपल्याला दिलेली बातमी/लेख फक्त नकारात्मक दृष्टिकोनातून लिहिला असेल तर त्याच्या इतर बाजू शोधून त्या मांडणीचा ते फेरविचार करू शकतात.

**प्रसारमाध्यमांमध्ये काम करणाऱ्या लोकांसाठी– दृष्टिकोनाची तपासणी**

| **मानसिकता** | **या मानसिकतेतून केला जाणारा युक्तिवाद** | **मानसिकता सकारात्मक आहे का नकारात्मक** |
|---|---|---|
| समलैंगिकता आपल्या संस्कृतीच्या विरुद्ध आहे | समलैंगिकता ही पाश्चात्त्य संस्कृतीतून आलेली आहे. ती भारतीय संस्कृतीत बसत नाही व कोणताही धर्म याला मान्यता देत नाही. | नकारात्मक (ऐतिहासिक दृष्ट्या असत्य) |
| समलैंगिकता अनैसर्गिक आहे. | दोन पुरुष किंवा दोन स्त्रिया एकमेकांशी कसं काय प्रेम करू शकतात ?यांच्या लैंगिक | नकारात्मक (काही प्राणी व पक्षांमध्येही |

| | | |
|---|---|---|
